# नवोदय विद्यालय समिती

## जवाहर नवोदय विद्यालय,निवड परीक्षा माहितीपत्रक २०१९

### वर्ग ६ वी मध्ये प्रवेशा करिता

## नवोदय विद्यालय योजना

### प्रस्तावना

भारत सरकारने १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जवाहर नवोदय विद्यालये सुरु केली. २८ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ६६१ जवाहर नवोदय विद्यालये आहेत. भारत सरकारच्या संपूर्ण आर्थिक सहाय्याने नवोदय विद्यालय समिती या स्वायत्त यंत्रणेमार्फत मुलां-मुलींसाठी निवासी जवाहर नवोदय विद्यालये सुरु करण्यात आलेली आहेत. जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत 'जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी' परीक्षेद्वारे प्रवेश देण्यात येतो. शिक्षणाचे माध्यम इयत्ता आठवी पर्यंत मातृभाषा किंवा विभागीय भाषा असून त्यानंतर गणित व विज्ञान इंग्रजी भाषेतून आणि समाजशास्त्र हिंदी भाषेतून शिकविण्यात येतात. जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १०वी व १२ वी च्या परीक्षांना बसतात. या विद्यालयातील विद्यार्थ्यांना भोजन,गणवेश, निवास आणि वह्या-पुस्तके आदींची मोफत व्यवस्था केली जाते. परंतु ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रु. नाममात्र शुल्क (फी) विद्यालय विकास निधी म्हणून घेतली जाते. जे विद्यार्थी अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती, सर्व मुली,दिव्यांग आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न गरिबी रेषेच्या खाली आहे या सर्वांना यातून सूट आहे . **सर्व विद्यार्थी** ज्यांचे पालक **सरकारी कर्मचारी** आहेत त्या विद्यार्थ्यासाठी रु. १५०० प्रती माह फी विद्यालय विकास निधी म्हणून जमा करावी लागेल.

### १.१ योजेनेची वैशिष्ट्ये:

१. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना दर्जेदार आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यामध्ये सांस्कृतिक संवर्धन,मूल्य संवर्धन, पर्यावरणाचे ज्ञान , शारीरिक शिक्षण इत्यादी वाढीस लावणे.

२. विद्यार्थ्यामध्ये त्रिभाषा सूत्राप्रमाणे तीन भाषांचे किमान ज्ञान वृद्धिंगत करणे.

३. हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना अहिंदी भाषिक प्रदेशामध्ये व अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना हिंदी भाषिक प्रदेशामध्ये स्थलांतरित करून राष्ट्रीय एकात्मता साधणे.

४. प्रत्येक जिल्ह्यामध्ये मार्गदर्शक व आदर्श संस्था स्थापना करून परिसरातील संस्थाना उत्कृष्टतेच्या ध्येयासाठी प्रेरणा देणे.

### १.२ राज्यनिहाय जवाहर नवोदय विद्यालयांची स्थिती:

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक जवाहर नवोदय विद्यालय उघडण्याचे निश्चित करण्यात आले असून सध्या २८ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशमध्ये ६६१ जवाहर नवोदय विद्यालये मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ६२९ कार्यरत आहेत. राज्यनिहाय जवाहर नवोदय विद्यालयांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | राज्य | संख्या | अ.क्र. | राज्य | संख्या | अ.क्र. | राज्य | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | 13+02 | १३. | हरियाणा | 21 | २५. | नागालँड | 11 |
| २. | आसाम | 27+01 | १४. | हिमाचल प्रदेश | 12 | २६. | ओरिसा | 30+01 |
| ३. | अरुणाचल प्रदेश | 18 | १५. | जम्मू व काश्मीर | 22+01 | २७. | पंजाब | 22+01 |
| ४. | अंदमान व निकोबार बेटे | 03 | १६. | झारखंड | 24+02 | २८. | पुडुचेरी | 04 |
| ५. | बिहार | 38+01 | १७. | कर्नाटक | 30+01 | २९. | राजस्थान | 33+02 |
| ६. | चंडीगड | 01 | १८. | केरळ | 14 | ३०. | सिक्कीम | 04 |
| ७. | छत्तिसगढ | 27+01 | १९. | लक्षद्वीप | 01 | ३१. | त्रिपुरा | 08 |
| ८. | दिल्ली | 09 | २०. | मध्यप्रदेश | 51+02 | ३२. | तेलंगाना | 09 |
| ९. | दमन व दिव | 02 | २१. | महाराष्ट्र | 33+01 | ३३. | उत्तरप्रदेश | 75+01 |
| १०. | दादरा व नगर हवेली | 01 | २२. | मणिपूर | 09+02 | ३४. | उत्तराखंड | 13 |
| ११. | गोवा | 02 | २३. | मेघालय | 11+01 | ३५. | पश्चिम बंगाल | 19+01 |
| १२. | गुजरात | 33+01 | २४. | मिझोरम | 08 | **एकूण :- ६३८+२२**+१* = ६६१** | | |

**** ज्या जिल्ह्यात अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त आहे,तेथे अतिरिक्त नवोदय विद्यालये मंजूर करण्यात आली आहेत.**
योग्य उमेदवार उपलब्ध असल्यास प्रत्येक विद्यालयामध्ये इयत्ता सहावीत प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून ८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. जर पुरेशी जागा उपलब्ध झाली नाही तर विद्यार्थी प्रवेश संख्या ८० वरून ४० पर्यंत खाली आणणे, विद्यालय प्रवेश परीक्षा स्थगित करणे किंवा प्रवेश परीक्षेचा निकाल स्थगित करणे(राखून ठेवणे) या बाबतचा हक्क नवोदय विद्यालय समिती राखून ठेवत आहे.

## १.३ जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०१९:

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता सर्व नवोदय विद्यालयांसाठी **शनिवार दि. ६ एप्रिल २०१९ रोजी सकाळी ११.१५** वाजता एकाच टप्यात सर्व नवोदय विद्यालयांसाठी घेण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ हा आहे.**

## २. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०१९ साठी ऑनलाईन अर्ज कसा करावा?

## २.१ जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०१९ साठी ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया :-

१. जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी अर्ज करण्याची प्रक्रिया ऑनलाईन द्वारे सोपी व सरळ केली आहे. ऑनलाईन अर्ज नोंदणी नवोदय विद्यालय समिती च्या www.navodaya.gov.in या संकेत स्थळावर जाऊन Admission Portal NVS च्या माध्यमातून विनामुल्य करता येईल. उमेदवाराचे निवास (ग्रामीण/शहरी), वय, शैक्षणिक पात्रता, इ. साठी पुराव्याची विस्तृत आणि सविस्तर तपासणी फक्त निवड झालेल्या उमेदवारांचीच केली जाईल.

२. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना, ते पाचवी शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून योग्यरित्या भरलेले प्रमाणपत्र ज्यावर स्वत:चे अलीकडील काळात काढलेले छायाचित्र आणि स्वत:ची तसेच पालकाची स्वाक्षरी व मुख्याध्यापकाकडून प्रतिहस्ताक्षरित केलेले प्रमाणपत्र ( jpg स्वरूपात, 10kb-100kb प्रमाणात) ऑनलाईन अपलोड करावयाचे आहे.

३. पात्र एन. आय. ओ. एस. (N.I.O.S.) उमेदवारांनी 'बी' प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक आहे आणि राहण्याचा तोच जिल्हा असावा जेथे तो/ती प्रवेश घेऊ इच्छित आहे.

४ . अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया खुली, सोपी व विनामूल्य आहे.उमेदवार कोणत्याही माध्यमातून ऑनलाईन अर्ज भरू शकतात जसे, त्यांचा स्व शाळेतील संगणक, सायबर कॅफे, स्वत:च्या घरील संगणक, लॅपटॉप, मोबाईल, टॅब इत्यादी.

५. सर्व जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये उमेदवारांच्या व पालकांच्या मदतीसाठी मदत केंद्र स्थापन केले आहे. त्याव्दारे ते आपला अर्ज विना मूल्य भरू शकतील. पालक देखील आपल्या पाल्याला सोबत घेऊन आवश्यक कागद पत्रे, छायाचित्र आणि मुख्याध्यापकाची सही व शिक्का असलेले प्रमाणपत्र व चालू परिस्थितितील मोबाईल घेऊन जवाहर नवोदय विद्यालयाच्या मदत केंद्रावर जाऊन आपला अर्ज भरू शकतात. चालू परिस्थितीतील मोबाईल नोंदणीसाठी व SMS साठी सोबत ठेवणे आवश्यक आहे.

## २.२ : प्रवेश पत्र मिळण्या संबंधी:-

प्रवेश पत्र हे ज्या पोर्टल वर उमेदवाराने भरले आहे त्याच पोर्टलवरून दिनांक १ मार्च २०१९ पासून विनामूल्य उपलब्ध होतील. ते प्रवेश पत्र जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षा सुरु होण्यापूर्वी उमेदवार किंवा त्यांचे पालक डाऊनलोड करू शकतील.

## २.३ निवड चाचणीचा निकाल .

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०१९ चा निकाल हा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लागणे अपेक्षित आहे. निवड चाचणीचा निकाल संबंधित ज.न.वी. साठी खालील कार्यालयामध्ये प्रदर्शित केला जाईल .

१. जवाहर नवोदय विद्यालय
२. जिल्हा शिक्षण अधिकारी कार्यालय
३. जिल्हा दंडाधिकारी कार्यालय
४. उपायुक्त नवोदय विद्यालय समिती सम्भागीय कार्यालय
५. नवोदय विद्यालय समिती च्या www.navodaya.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असेल .

उमेद्वार आपला निकाल ॲडमिशन पोर्टलवरून देखील बघू शकतील **प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय यांच्याकडून संबंधित उमेदवारांना शीघ्र डाकेद्वारे (स्पीड पोस्ट) कळवले जाईल . तसेच हा** निकाल एस. एम एस. **व्दारा** देखील **निवड** झालेल्या उमेद्वारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर देखील कळविण्यात येईल

## निवड आणि प्रवेश

३.१) प्रवेश चाचणीतून निवड झाली म्हणजे विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशास पात्र झाला असे मानू नये. प्रत्यक्ष प्रवेश घेतेवेळी नवोदय विद्यालय समितीने ठरवून दिलेली संबंधित प्रमाणपत्रे सादर केल्यानंतरच प्रवेश निश्चित केला जाईल तो पर्यंत निवड तात्पुरत्या स्वरूपाची समजली जाईल. **सर्व उमेद्वारांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपली निवड संबंधीत जवाहर नवोदय विद्यालयामध्ये सुनिश्चित झाल्यानंतर तसेच त्यांच्या कागद पत्रांची पडताळणी केल्यानंतर आपल्या पूर्वीच्या शाळेत ती शाळा सोडल्याचा दाखला मिळण्या संबंधी अर्ज करावा.**

३.२) कुठल्याही तक्रारीच्या संदर्भात नवोदय विद्यालय समितीचा निर्णय हा अंतिम व उमेदवारास बंधनकारक राहील.

३.३) निवड झालेल्या व निवड न झालेल्या उमेदवारांचे गुण कळविले जाणार नाहीत.

३.४) उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करण्याची तरतूद नाही. संगणकावर निकाल तयार होत असल्यामुळे पुन्हा गुणांची बेरीज तपासली जात नाही. कारण निकाल तयार करताना प्रत्येक पायरीची काटेकोरपणे तपासणी करण्याची काळजी घेण्यात येत असते.

३.५) उमेदवार आणि पालक यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की जवाहर नवोदय विद्यालयाच्या योजनेनुसार एका अहिंदी राज्यातील जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थी नववीत गेला की त्याला दुसऱ्या हिंदी राज्यातील जवाहर नवोदय विद्यालयात व एका हिंदी राज्यातील जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थी नववीत गेला की त्याला दुसऱ्या अहिंदी राज्यातील जवाहर नवोदय विद्यालयात एका संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी स्थलांतरित केले जाते. निवड झालेल्या विद्यार्थ्याने स्थलांतरास नाकारले तर जवाहर नवोदय विद्यालयात पुढे शिकण्याची परवानगी नाकारली जाईल.

३.६) विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की विद्यार्थ्यांची निवड ज्या जिल्ह्यातून तो इयत्ता ५ वीत शिकत असेल व ज्या जिल्ह्याच्या नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेला बसला असेल त्या जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय येथे त्याला प्रवेश दिला जाईल. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. शिक्षणाच्या माध्यमाच्या कारणास्तव अथवा पालकांची बदली अन्य जिल्ह्यात किंवा राज्यात झाली या कारणास्तव विद्यार्थ्यांची बदली दुसऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

३.७) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या उमेदवारांनी त्यांच्या जातीची प्रमाणपत्रे निवड झाल्यास प्रवेश घेण्याच्या वेळी सादर केली पाहिजेत. अशी प्रमाणपत्रे ज्या वर्षात प्रवेश घ्यावयाचा आहे त्याच्या १५ एप्रिल पर्यंत सक्षम अधिकाऱ्याकडून मिळवलेली असली पाहिजेत म्हणजेच ती त्यांना प्रवेश घेतेवेळी जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांना सादर करणे शक्य होईल. उदाहरणार्थ शैक्षणिक सत्र २०१९-२० करिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता संबंधित प्रमाणपत्रे १५ एप्रिल २०१९ पर्यंत मिळवलेली असली पाहिजेत.

३.८) जे उमेदवार ग्रामीण जागेमधून प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी तिसरी,चौथी व पाचवी इयत्ता शासकीय/शासनमान्य /शासन संलग्न –प्रमाणित ग्रामीण शाळेमधून पूर्ण शैक्षणिक वर्षभर शिक्षण घेतले आहे असे प्रमाणपत्र संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन प्रवेश घेतेवेळी सादर करावे.

३.९) अपंग संवर्गातील (अस्थिव्यंग अपंगत्व ,कर्णबधीर/बहिरेपणा,दृष्टीचे अपंगत्व) उमेदवारांनी निवड झाल्यास प्रवेश घेतेवेळी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र सादर करावे.

३.१०) तृतीयपंथी उमेदवार ज्या जिल्ह्यामध्ये इ. ५ वी मध्ये नियमितपणे शिकत असतील त्याच जिल्ह्यातील नवोदय विद्यालयाच्या निवड चाचणी परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. निवड झाल्यास संबंधित राज्याच्या सक्षम अधिकाऱ्याचे तृतीयपंथी असल्याचे प्रमाण पत्र सादर करावे लागेल . या संवर्गातील उमेदवारासाठी राखीव जागेची तरतूद केलेली नाही.

# प्रवेश परीक्षा २०१९ करिता पात्रता

## सर्व उमेदवारासाठी

४.१) **जो** उमेद्वार इयत्ता ५ वी मध्ये शैक्षणिक सत्र २०१८ -१९ मध्ये त्या जिल्ह्यातील शासन/शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असला पाहिजे. तोच उमेद्वार त्या जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेत प्रवेश घेण्यास पात्र राहील.

ज्या जिल्ह्यामध्ये जवाहर नवोदय विद्यालय आहे त्याच जिल्ह्यातील उमेदवार प्रवेश परीक्षेला पात्र समजण्यात येतील.

४.२) प्रवेश परीक्षा देणाऱ्या उमेदवाराचा जन्म ०१/०५/२००६ **पूर्वी व** ३०/०४/२०१० (**दोन्ही दिवस समाविष्ट**) झालेला नसावा. ही अट अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या उमेदवारांसह सर्व उमेदवारांना लागू राहील. प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराच्या वयाबाबत शंका असल्यास सदरची बाब वैद्यकीय मंडळाकडे वयाचे निश्चितीकरण करण्यास्तव मांडली जाईल. वैद्यकीय मंडळाने दिलेला निर्णय अंतिम राहील.

४.३) निवड चाचणीसाठी बसणारा उमेदवार हा तो ज्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घेऊ इच्छित असेल , त्या जिल्ह्यातील सरकारी / निमसरकारी अनुदानित / मान्यताप्राप्त शाळेत किंवा राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थेच्या "ब" वर्गातील शाळेत इयत्ता पाचवीत संपूर्ण शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये शिकत असला पाहिजे.एखाद्याशाळेस शासन किंवा शासकीय प्राधिकरण यांची मान्यता असेल तर ती शाळा मान्यताप्राप्त समजली जाईल. तसेच शासन/शासकीय प्राधिकरणाद्वारा प्रायोजित शाळा तसेच राष्ट्रीय मुक्त विद्यालये संस्थेने दर्जा दिलेल्या मुक्त शाळा याही मान्यता प्राप्त समजण्यात येतील. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी विद्यार्थी हा अशा शाळांमधून इयत्ता पाचवी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाला पाहिजे. तरच इतर अटींच्या अधीन राहून २०१९-२० मध्ये त्याला इयत्ता सहावी करिता प्रवेश दिला जाईल.

४.४) जे उमेदवार ग्रामीण जागेमधून प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी तिसरी,चौथी व पाचवी इयत्ता शासकीय/शासनमान्य /शासन संलग्न –प्रमाणित ग्रामीण शाळेमधून पूर्ण शैक्षणिक वर्षभर शिक्षण घेतले असले पाहिजे.

४.५) जे विद्यार्थी 'राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थान ' चे 'बी ' सर्टिफिकेट घेऊन इयत्ता पाचवी ३० सप्टेंबर २०१८ पूर्वी उतीर्ण होतील त्यांनाही परीक्षेला बसता येईल . त्यांना वयाची अट इतर विद्यार्थ्यांप्रमाणे राहील. असे विद्यार्थी मागील तीन वर्षे ग्रामीण भागात राहत असतील , तर त्यांचा ग्रामीण स्तर मा. तहसीलदार किंवा मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रावर अवलंबून राहील. जे विद्यार्थी वरील योजनेंतर्गत शहरी किंवा निश्चित केलेल्या भागात येत असतील ते ग्रामीण आरक्षणास पात्र राहणार नाहीत.

४.६) तथापि ज्या जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु झाले व त्या जिल्ह्याची नंतर विभागणी झाली असेल व नवीन जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु झाले नसेल तर विद्यालय प्रवेश पात्रतेचा विचार करतांना जुन्या जिल्ह्याची सीमा विचारात घेतली जाईल.

४.७ ) उमेदवाराने जर **१५ सप्टेंबर** २०१८ पूर्वी पाचवीत प्रवेश घेतला नसेल किंवा तो अनुत्तीर्ण असेल तर तो प्रवेश अर्ज करण्यास अपात्र राहील.

४.८) **उमेदवाराला कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्यांदा प्रवेश चाचणीस बसता येणार नाही.**

## ग्रामीण उमेदवारासाठी

अ) प्रत्येक जिल्ह्यातील किमान ७५ टक्के जागा ग्रामीण उमेदवारांना देण्यात येतील आणि उरलेल्या जागा त्याच जिल्ह्यातील शहरी विभागातून भरण्यात येतील.

ब) उमेदवाराने ग्रामीण विभागातून तिसरी,चौथी आणि पाचवी इयत्ता (सलगपणे) प्रत्येक वर्षी पूर्ण शैक्षणिक वर्ष भरून शासनमान्य शाळेतून अभ्यास केला असल्यास ग्रामीण जागांसाठी त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल. तथापि असा उमेदवार इयत्ता पाचवी त्याच जिल्ह्याच्या शाळेत शिकत असला पाहिजे ज्या जिल्ह्याच्या जवाहर नवोदय विद्यालयात त्याला प्रवेश घेण्याची इच्छा आहे.

क) ज्या उमेदवारांनी राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था यामधून शिक्षण घेतले असेल त्यांनी मा. जिल्हाधिकारी/ मा. तहसीलदार किंवा मा. गटविकास अधिकारी यांचे ग्रामीण भागात राहत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

## शहरी उमेदवारासाठी

उमेदवाराने तिसरी,चौथी आणि पाचवी यातील एक वर्ष किंवा एक दिवस जरी शहरी भागात अध्ययन केले असेल किंवा शहरी विभागातून एखादी इयत्ता उत्तीर्ण झाला असेल तर त्याला शहरी विभागातील समजण्यात येईल. २०११ च्या

जनगणनेनुसार किंवा शासकीय परिपत्रकानुसार शहरी म्हणून जाहीर झालेल्यास शहरी मानले जाईल. इतर सर्व विभाग ग्रामीण समजले जातील.

### तृतीयपंथी उमेदवारासाठी

तृतीयपंथी उमेदवारांसाठी वेगळया राखीव जागा नसून त्यांना मुलांच्या गटातून अर्ज करता येईल. ग्रामीण,शहरी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग संवर्गातील राखीव जागा मुलांप्रमाणे ग्राह्य धरण्यात येतील.

## राखीव जागा

अ) प्रत्येक जिल्ह्यातील ७५ टक्के जागा ग्रामीण उमेदवारांना देण्यात येतील आणि उरलेल्या जागा त्याच जिल्ह्यातील शहरी विभागातून भरण्यात येतील.

ब) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी असणाऱ्या राखीव जागेचे प्रमाण हे पूर्ण जिल्ह्यातील लोकसंखेच्या प्रमाणत आहे परंतु कोणत्याही जिल्ह्यात हे प्रमाण राष्ट्रीय प्रमाण सरासरीपेक्षा (अनुसूचित जाती १५ % व अनुसूचित जमाती ७.५%) कमी असणार नाही. परंतु जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी (दोन्ही वर्गाचे एकत्रित ) कमाल राखीव जागा ५०% राहतील. विशेष परीस्थिती अंतर्गत या दोन्ही मधील राखीव जागांच्या प्रमाणात अंतर्गत बदल केला जाऊ शकतो परंतु उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाईल.

क) मुलींसाठी १/३ (एक तृतीयांश) राखीव जागांची तरतूद आहे.

ड) ****** दिव्यांग उमेदवारांसाठी ३ टक्के राखीव जागांची तरतूद आहे. (ज्या अंतर्गत अस्थिव्यंग अपंगत्व, कर्णबधीर/बहिरेपणा, दृष्टीचे अपंगत्व यांचा समावेश आहे.)

** **दृष्टीचे अपंगत्व** म्हणजे खालील दिलेल्या स्थितीप्रमाणे जर ;

i) संपूर्ण दृष्टिहीन किंवा,

ii) दृष्टीदोष घालविण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या चष्म्याचा नंबर ६/६० किंवा २०/२०० (स्नेलेन) या पेक्षा जास्त नसावा किंवा,

iii) दृष्टीची मर्यादा २० डिग्री कोन किंवा त्यापेक्षा अधिक नसावी.

** **कर्णबधीर/बहिरेपणा** म्हणजे ६० डेसीबलची ध्वनी किंवा संभाषण ऐकण्याची क्षमता या पेक्षा जास्त असावी.

** **स्थलांतराचे पंगुत्व** म्हणजे अस्थिसांध्याचे पंगुत्व किंवा शरीरातील अवयवांचे सुरळीतपणे हालचाल करण्यास अडचणी निर्माण होणे किंवा सेरेब्रल पाल्सी(मेंदूचा अर्धांग वायू).

** व्यक्तीला असलेले अपंगत्व म्हणजे कायदेशीर वैद्यकीय अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र दिले असले पाहिजे की संबंधित व्यक्तीला ४० टक्के पेक्षा कमी अपंगत्व नाही.

**

## निवडीनंतर सादर करावयाचे कागद पत्रे

**उमेदवाराची प्रवेश परीक्षेमधून निवड झाल्यास प्रत्यक्ष प्रवेश घेते वेळी पालकांना खालील प्रमाणपत्र/कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल.**

१. रहिवाशी प्रमाणपत्र

२. जन्मतारखेचा पुरावा.(आवश्यक वाटल्यास मेडिकल बोर्ड पडताळणी करू शकतात.)

३. नवोदय विद्यालय समितीच्या नियमानुसार योग्यता प्रमाणपत्रे

४. ग्रामीण विभागातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराच्या पालकांनी त्यांचा पाल्य ग्रामीण भागातून शिकला असल्याचे शपथ पत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५. इतर संबंधित कागदपत्रे .

# निवड चाचणीबाबत

## १ परीक्षा केंद्र

उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर जे परीक्षा केंद्र नोंदविलेले आहे त्याच परीक्षा केंद्रावर त्याला परीक्षा द्यावी लागेल. नोंदविल्या गेलेल्या केंद्राव्यतिरिक्त इतर केंद्रावर त्याला परीक्षा देता येणार नाही. कोणत्याही कारणास्तव एकदा दिलेले परीक्षा केंद्र बदलण्याची विनंती मान्य होणार नाही. कोणत्याही उमेदवाराला योग्य प्रवेशपत्राशिवाय चाचणी परीक्षेला बसता येणार नाही. प्रवेश पत्र नवोदय विद्यालय समितीच्या " www.navodaya.gov.in" या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.

## २. चाचणी परीक्षेचे माध्यम

जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेचे माध्यम राज्य आणि केंद्रशासित प्रदेशानुसार पुढील तक्त्याप्रमाणे निवडता येईल.

| राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे नाव | भाषा |
|---|---|
| अंदमान व निकोबार बेटे | हिंदी,इंग्रजी, तमिळ,उर्दू,बंगाली |
| आंध्रप्रदेश | हिंदी,इंग्रजी,तेलगू, मराठी,उर्दू,ओरिया , कन्नड |
| अरुणाचल प्रदेश | हिंदी,इंग्रजी |
| आसाम | इंग्रजी,हिंदी,आसामी,बोडो,गारो,बंगाली,मणिपुरी(बंगाली लिपी),मणिपुरी(मैतेये मयेक) |
| बिहार | इंग्रजी,हिंदी,उर्दू. |
| चंडीगड | इंग्रजी,हिंदी,पंजाबी |
| छत्तिसगढ | इंग्रजी,हिंदी, |
| दिल्ली | इंग्रजी,हिंदी, |
| गोवा | इंग्रजी,हिंदी,मराठी,कन्नड |
| गुजरात | इंग्रजी,हिंदी,मराठी,गुजराती |
| हरियाणा | इंग्रजी,हिंदी, |
| हिमाचल प्रदेश | इंग्रजी,हिंदी, |
| जम्मू आणि काश्मीर | इंग्रजी,हिंदी,उर्दू |
| झारखंड | इंग्रजी,हिंदी,उर्दू,ओरिया |
| कर्नाटक | इंग्रजी,हिंदी,कन्नड,तेलगू,मराटी,उर्दू,मलयालम,तमिळ |
| केरळ | इंग्रजी,हिंदी,कन्नड,मलयालम,तमिळ |
| लक्षद्वीप | इंग्रजी,हिंदी,मलयालम |
| मध्यप्रदेश | इंग्रजी,हिंदी,उर्दू,मराठी,गुजराती |
| महाराष्ट्र | इंग्रजी,हिंदी,कन्नड,तेलगू,मराटी,उर्दू,मलयालम,गुजराती |
| मणिपूर | इंग्रजी,हिंदी, मणिपुरी(मैतेयी मयेक) |
| मेघालय | इंग्रजी,हिंदी, खासी,गारो,बंगाली,आसामी. |
| मिझोरम | इंग्रजी,हिंदी,मिझो. |
| नागालँड | इंग्रजी,हिंदी, |
| ओरिसा | इंग्रजी,हिंदी, तेलगू,ओरिया,उर्दू. |
| पुद्दुचेरी | इंग्रजी,तमिळ,तेलगू,मल्याळम,हिंदी |
| पंजाब | इंग्रजी,हिंदी,पंजाबी |
| राजस्थान | इंग्रजी,हिंदी, |
| सिक्कीम | इंग्रजी,हिंदी,नेपाली |
| तेलंगाना | इंग्रजी,हिंदी,तेलगु,कन्नड,मराटी,उर्दू |
| दमण आणि दीव | इंग्रजी,हिंदी,गुजराती |
| दादरा व नगरहवेली | इंग्रजी,हिंदी,गुजराती,मराठी |

| | |
|---|---|
| उत्तर प्रदेश | इंग्रजी,हिंदी,उर्दू. |
| उत्तराखंड | इंग्रजी,हिंदी,उर्दू. |
| पश्चिम बंगाल | इंग्रजी,हिंदी,बंगाली,नेपाली,उर्दू. |

**नोंद :- उमेदवाराला त्याने त्याच्या प्रवेश अर्जात नमूद केलेल्या भाषामाध्यमाचीच चाचणी पुस्तिका पुरविण्यात येईल.**

## ३. चाचणी परीक्षेचे स्वरूप

चाचणी परीक्षा ही स.११.३० ते दु.१.३० अशी सलग दोन तासांची असून त्यामध्ये तीन विभाग असतील आणि प्रत्येकात फक्त वस्तुनिष्ठ प्रश्नांचाच समावेश असेल. चाचणीमध्ये एकूण ८० प्रश्न असतील व ती १०० गुणांची असेल. उमेदवारांना १५ मिनिटांचा अधिक वेळ सूचना वाचावयास दिला जाईल. म्हणून उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्या पूर्वी म्हणजे दिनांक ०६ एप्रिल २०१९ ला सकाळी ११ वाजता परीक्षा केंद्रावर आपली उपस्थिती दर्शवावी.

| चाचणीचा प्रकार | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|
| मानसिक क्षमता चाचणी | ४० | ५० | ६० मिनिटे |
| अंकगणित चाचणी | २० | २५ | ३० मिनिटे |
| भाषा चाचणी | २० | २५ | ३० मिनिटे |
| **एकूण** | **८०** | **१००** | **२ तास** |

तीन विभाग एकाच पुस्तिकेमध्ये समाविष्ट असलेली एक चाचणी पुस्तिका प्रत्येक उमेदवाराला पुरविण्यात येईल.

दिव्यांग उमेदवारांना अतिरिक्त ३० मिनिटे कालावधी चा वेळ देण्यात येईल.

## 3. उत्तरे नोंदविण्याची पद्धत :-

अ.) **उमेदवारांना** उत्तरासाठी स्वतंत्र उत्तर पत्रिका OMR (ओप्टीकल कॅरेक्टर रेकग्रिशन ) देण्यात येईल. उमेदवाराने स्वत: उत्तराच्या नोंदी उत्तरपत्रिकेत नेमून दिलेल्या OMR पत्रिकेत करावयाच्या आहेत. उत्तरपत्रिकेचा नमुना (OMR पत्रिका) जवाहर नवोदय विद्यालय समितीच्या संकेत स्थळावर अपलोड केली जाईल.

ब) उमेदवाराने स्वत:चे बॉलपेन आणावयाचे आहे. उमेदवाराने उत्तरे लिहिण्याकरिता काळा/निळा बॉलपेनच वापरावा. शिसपेन्सिलचा वापर चाचणी परीक्षेत करता येणार नाही.

क) प्रत्येक प्रश्नांसाठी चार संभाव्य उत्तरे सुचविलेली असतील त्यातील एकच उत्तर अचूक असेल. उमेदवाराने अचूक उत्तराचा पर्याय निवडावा आणि तो निवडलेला पर्याय गडद करावा उदाहरणार्थ जर तुमच्या प्रश्न क्र. ३७ चा योग्य पर्याय जर क असेल तर तो क पर्याय खाली दिल्या प्रमाणे गडद करावा.




ड) उत्तरपत्रिकेतील एकदा लिहिलेले उत्तर बदलता येणार नाही. लिहिलेले उत्तर गिरविले,दुरुस्त केले किंवा खाडाखोड केली तर ते OMR पत्रिकेतील उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.

इ) चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा केले जाणार नाहीत.

### ४. सूचना आणि उदाहरणासंबंधी

अ) उमेदवाराने चाचणी पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर तसेच प्रत्येक विभागाच्या सुरुवातीला दिलेल्या सूचना, प्रश्न सोडविण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचाव्यात. परीक्षेसाठी उमेदवाराने चाचणी पुस्तिका त्याने निवडलेल्या भाषेतील आहे याची खात्री करून घ्यावी जर त्याला/तिला दुसऱ्या भाषेतील चाचणी पुस्तिका नजरचुकीने दिली गेली असल्यास त्याने/तिने उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी (परीक्षेच्या सुरुवातीलाच ) बदलून घ्यावी. प्रवेश अर्जामध्ये नमूद केलेल्या भाषेमधील चाचणी पुस्तिका घेण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील. या संदर्भात परीक्षा संपल्यानंतर कोणतीही तक्रार/पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

ब) एकूण वेळ सलग दोन तास राहील. दिव्यांग उमेदवारांना अतिरिक्त ३० मिनिटे कालावधी चा वेळ देण्यात येईल.

क)	प्रवेशास पात्र होण्यासाठी चाचणीच्या तीनही विभागात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.  सुचविलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ उमेदवाराने एकाच विभागावर खर्च करू नये.  अर्थात वेळेची विभागणी स्वत:च्या मर्जीनुसार करण्याची मुभा उमेदवाराला आहे.

१.	योग्य प्रवेशपत्र दाखविल्याशिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा दालनात प्रवेश मिळणार नाही.

२.	उमेदवाराने बरोबर ११.०० किंवा तत्पूर्वी आपल्या जागेवर स्थानापन्न व्हावे. चाचणी परीक्षा सुरु झाल्यानंतर उमेदवाराला परीक्षा दालनात प्रवेश मिळणार नाही.

३.	दर तीस मिनिटाला घन्टा होईल.

४.	चाचणी परीक्षेची पूर्ण वेळ संपण्यापूर्वी कोणत्याही उमेदवाराला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

## निवड चाचणीचे स्वरूप

**विभाग १-  बौद्धिक चाचणी.**

ही अशाब्दिक परीक्षा आहे.  प्रश्न आकृतीवर आधारित आहेत.  हे प्रश्न विद्यार्थ्यांचे सर्वसाधारण  बौद्धिक कार्याचे आकलन करणारे आहेत.  हा विभाग दहा प्रकारात विभागाला आहे.  प्रत्येक प्रकारात चार प्रश्न आहेत.  खाली काही उदाहरने दिली आहेत.

### प्रकार-पहिला (गटात न बसणारे)

सूचना :

एक ते चार प्रश्नात प्रत्येकी चार आकृत्या अ.ब.क.ड दिलेल्या आहेत.  या चार आकृत्यांपैकी, तीन आकृत्या काही प्रमाणात साम्य दर्शक आहेत व एक आकृती वेगळी आहे.  वेगळी असणारी आकृती शोधा.




बरोबर उत्तर  (अ)

### प्रकार-दुसरा  (आकृतितील साम्यता)

सूचना : प्रश्न क्रमांक ५ ते ०८ मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृती दिलेली आहे. आणि उजव्या बाजूला उत्तराच्या अ.ब.क.ड आकृत्या दिलेल्या आहेत.  त्यातील प्रश्न आकृतीला साम्य  असणारी आकृती शोधा.




बरोबर उत्तर  (क)

## प्रकार-तिसरा (नमुन्याप्रमाणे पूर्ण आकृती )

सूचना : प्रश्न क्रमांक ०९ ते १२ मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृती दिलेली आहे. त्यातील एक भाग अपूर्ण आहे. उजव्या बाजूला उत्तराच्या अ.ब.क.ड आकृत्या दिलेल्या आहेत. त्यातील एक आकृती अशी निवडा की तिची दिशा न बदलता जशीच्या तशी प्रश्न आकृतीत बसविली तर प्रश्न आकृती पूर्ण होईल.




बरोबर उत्तर (अ)

## प्रकार-चौथा (आकृतीक्रम पूर्णता)

सूचना : प्रश्न क्रमांक १३ ते १६ मध्ये डाव्या बाजूला तीन प्रश्न आकृत्या दिलेल्या आहेत. चौथ्या आकृतीसाठी डावीकडे जागा रिकामी ठेवली आहे. प्रश्न आकृत्यांमध्ये एक क्रम किंवा संगती आहे. उत्तर आकृत्यामधील उजवीकडील एक आकृती अशी निवडा की ती प्रश्न आकृत्यांपैकी रिकाम्या जागेत बसविल्यास प्रश्न आकृत्यांचा क्रम किंवा संगती कायम राहील.

18




बरोबर उत्तर (क)

## प्रकार-पाचवा (भिन्न आकतितील समानता)

प्रश्न क्रमांक १७ ते २० मध्ये आकृत्यांचे दोन संच आहेत. दुसऱ्या संचात प्रश्नचिन्ह आहे. पहिल्या संचातील पहिल्या व दुसऱ्या आकृतीत काही संबंध आहे. तसा तिसऱ्या व चौथ्या आकृतीत असायला हवा. तसा संबंध येण्यासाठी प्रश्न चिन्हाच्या जागी योग्य ती आकृती उत्तर आकृत्यांमधून शोधा.




बरोबर उत्तर (अ)

## प्रकार-सहावा (भौमितिक आकृत्यातील पूर्णता-त्रिकोण,चौरस,वर्तुळ)

सूचना : प्रश्न क्रमांक २१ ते २४ मध्ये डाव्या बाजूला भौमितिक आकृतिचा एक भाग दिलेला आहे. आणि उरलेला भाग उजवीकडील उत्तर आकृती अ.ब.क.ड मध्ये दिलेली आहे. प्रश्न आकृती पूर्ण होण्याकरिता योग्य ती आकृती उत्तर आकृत्यांमधून शोधा.




बरोबर उत्तर (अ)

## प्रकार-सातवा (आरसा प्रतिबिंब )

सूचना : प्रश्न क्रमांक २५ ते २८ मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्न आकृती दिलेली आहे. उजवीकडे अ.ब.क.ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. त्यातील प्रश्न आकृतीची आरसा प्रतिबिंब दर्शविणारी आकृती शोधा.




अ ब क ड

बरोबर उत्तर (ड)

## प्रकार-आठवा (घड्या घालुन/उलगड्न तयार झालेल्या आकृत्या)

सूचना : प्रश्न क्रमांक २९ ते ३२ मध्ये डाव्या बाजूला कागदाला घड्या घालून पाडलेल्या प्रश्न आकृत्या आहेत. उजव्या बाजूला अ.ब.क.ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. प्रश्न आकृतीची घडी उघडल्यावर ती कशी दिसेल ते उत्तर आकृतीमधून शोधा.



अ ब क ड

बरोबर उत्तर (अ)

## प्रकार-नववा (आकती कल्पना )

सूचना : प्रश्न क्रमांक ३३ ते ३६ मध्ये डाव्या बाजूला विविध आकारातील तुकडे प्रश्न आकृती म्हणून दिलेले आहेत. हे तुकडे जोडल्यावर कोणती आकृती तयार होते ती उजव्या बाजूला दिलेल्या अ.ब.क.ड उत्तर आकृत्यामधून शोधा.



(अ) (ब) (क) (ड)

बरोबर उत्तर (ड)

## प्रकार-दहावा (लपलेल्या आकृत्या )

सूचना : प्रश्न क्रमांक ३७ ते ४० मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृती दिलेली असून उजव्या बाजूला अ.ब.क.ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. कोणत्या आकृतीत प्रश्न आकृती दडलेली आहे ते शोधा.



अ ब क ड

**बरोबर उत्तर (ब)**

## विभाग २- अंकगणित चाचणी.

या चाचणीचाउद्देश उमेदवाराच्या अंकगणितातील मुलभूत क्षमता तपासणे हा आहे. या विभागातील २० प्रश्न हे खाली दिलेल्या १५ घटकांवर आधारित असतील.

१. संख्या आणि संख्यालेखन पद्धती.

२. पूर्ण संख्यांवरील चार मुलभूत क्रिया.

३. अपूर्णांक आणि त्यावरील चार मूलभूत क्रिया.

४. अवयव व गुणक आणि त्यांचे गुणधर्म.

५. संख्यांचे ल.सा.वि आणि म.सा.वि.

६. दशांश अपूर्णांक आणि त्यावरील मूलभूत क्रिया.

७. दशांश आणि व्यावहारिक अपूर्णांक यांचे एकमेकात रुपांतर.

८. वस्तूंचे लांबी,रुंदी,उंची,वस्तुमान,आकारमान, वेळ, पैसा, यांचे मापन करण्यासाठी संख्यांचा वापर.

९. अंतर,काल, आणि गती यांचे मापन .

१०. गणितीय सूत्रांचे अंदाजीकरण.

११. गणितीय सूत्रांचे सरलीकरण

१२. शतमान आणि त्यांचे उपयोग.

१३. नफा व तोटा यावरील उदाहरणे.

१४. सरळव्याज यावरील उदाहरणे.

१५. परिमिती,क्षेत्रफळ, घनफळ,(आकारमान) यावरील उदाहरणे.

नोंद- या चाचणीत गणितातील संबोध आणि कौशल्याचे आकलन व उपाययोजना यांच्या मूल्यमापानावर मुख्यत: भर देण्यात येईल. अंकगणितातील चाचणीच्या प्रश्नांच्या प्रकारची माहिती होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनासाठी खाली काही उदाहरणे/नमुने दिले आहेत.

**उदाहरण: १. (आकलन कसोटी)**

१०००या संख्येचे मूळ अवयव कोणते?

**अ. १०x१०x१० क.) २x२x२x५x५**

**ब. २x५x५x१० ड.) २x२x२x५x५x५**

संख्यांचे मूळ अवयव काढताना दोन अटी (१) सर्व मूळ अवयवांचा गुणाकार दिलेल्या संख्येएवढा असला पाहिजे. (२) प्रत्येक अवयव ही मूळ संख्या असावी. **या ठिकाणी क्रमांक ड चे उत्तर सर्व अटी पूर्ण करणारे आहे. म्हणून ड हे अक्षर उत्तरपत्रिकेतील संबंधित प्रश्न क्रमांकासामोरील चौकोटीत लिहावयाचा आहे.**

**उदाहरण: २. (आकलन कसोटी)**

पहिल्या चार विषम संख्यांची सरासरी किती ?

अ. २.५ ब.) ४ क.) ५ ड.) १६

पहिल्या चार विषम संख्या म्हणजे १,३,५, आणि ७ या आहेत.त्यांची सरासरी (१+३+५+७)/४=४ येते. या ठिकाणी क्रमांक ब चे उत्तर ४ आहे. **म्हणून ब हे अक्षर उत्तरपत्रिकेतील संबंधित प्रश्न क्रमांकासामोरील चौकोटीत लिहावयाचा आहे.**

**उदाहरण: ३. (उपयोजन कसोटी)**

एक किलोमीटर लांबीची एक आगगाडी ३ मिनिट प्रती किलोमीटर वेगाने धावते. या गाडीला दोन किलोमीटर लांबीचा बोगदा पार करायला किती वेळ लागेल ?

अ.)१ मिनिट ब.) ३ मिनिटे क.) ६ मिनिटे ड.) ९ मिनिटे

वरील उदाहरणात बोगद्याची लांबी दोन किलोमीटर व आगगाडीची लांबी एक किलोमीटर दिली आहे. बोगदा ओलांडव्यास तीन किलोमीटर अंतर कापावे लागेल . गाडीचा वेग एक किलोमीटर ला ३ मिनिटे म्हणजे ३ किलोमीटर अंतर कापायला ९ मिनिटे वेळ लागेल. **म्हणून ड हे अक्षर उत्तरपत्रिकेतील संबंधित प्रश्न क्रमांकासामोरील चौकोटीत लिहावयाचा आहे.**

## विभाग ३- भाषा चाचणी.

या चाचणीचा उद्देश उमेदवाराची वाचन –आकलन क्षमता तपासणे हा आहे. या चाचणीमध्ये चार परिच्छेद असून प्रत्येक परिच्छेदाखाली पाच प्रश्न दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी ते परिच्छेद काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्यावीत. यासोबत व्याकरण व लेखन यांचे दहा प्रश्न असतील .

**परिच्छेद**

जंगले आपल्यासाठी अनेक प्रकारे उपयुक्त आहेत. आपल्याला घर बांधण्यासाठी ,लाकडी सामान बनविण्यासाठी, फर्निचर बनविण्यासाठी लाकूड मिळते. जंगले आपल्याला इंधन व कागद बनविण्यासाठी सुद्धा लाकूड देतात. ते पक्षी, प्राणी, व किटकांना निवारा देतात. जंगलामुळे पाऊस पडतो. जंगलाचे अस्तित्व हे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरणाची काळजी घेणे हे निर्विवाद आहे. पर्यावरण व त्यातील साधनसंपत्तीचा शहाणपणाने उपयोग करणे हे मानवाच्या अस्तित्वासाठी गरजेचे आहे.

**१. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी ------------------ ची आवश्यकता आहे.**

अ. जंगले ब. मानव

क. प्राणी ड. साधनसंपत्ती

**बरोबर उत्तर:- अ**

**२. संवर्धन या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ------------------ हा आहे.**

अ. संरक्षण ब. निवारा

क. निर्माण ड. विनाश

**बरोबर उत्तर:- ड**

**३. खालीलपैकी 'शहाणा' या शब्दाचा समानार्थी अर्थ नसणारा शब्द कोणता आहे?**

अ. समजूतदार ब. विनोदी

क. हुशार ड.विवेकपूर्ण

**बरोबर उत्तर:- ब**

**४. सुतारकाम हे जंगलावर अवलंबून आहे कारण जंगले ---------------पुरवितात.**

अ. इंधनासाठी लाकूड ब. कागद बनविण्यासाठी लाकूड

क. लाकडी सामान बनविण्यासाठी लाकूड ड. प्राण्यांसाठी आश्रय /निवारा

**बरोबर उत्तर:- क**

**५. जंगली प्राणी बेघर होतील जर -----------------------------------**

अ. कागद कारखाने नष्ट केले तर

ब. घरे बांधली तर

क. जंगले नष्ट केली तर ड. पर्यावरणाची काळजी घेतली तर

**बरोबर उत्तर:- क**

# <u>ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी काही महत्वाच्या सूचना</u>

जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणीचा ऑनलाईन भरावयाचा अर्ज हा सुस्पष्ट व अगदी सरळ आहे. तरी अर्ज भरतांना उमेदवार आणि त्यांच्या पालकांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. अर्जाचा नमुना व माहितीपत्रक कृपया काळजीपूर्वक वाचा. संपूर्ण अर्ज काळजीपूर्वक व पूर्णपणे भरा. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराचा जन्म (<u>०१/०५/२००६ ते ३०/०४/२०१०</u> **दोन्ही दिवस समाविष्ट**) या कालावधीत झाला आहे याची खात्री करून घ्या. तसेच इतर पात्रता अटी जसे इयत्ता ३,४,५ शासनमान्य /शासन संलग्न/शासन प्रमाणित/राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था मधील आहे याची खात्री करून घ्या. ग्रामीण /शहरी भागातील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करून घ्या.

२. ऑनलाईन अपलोड करण्यासाठी लागणारी कागदपत्रे जसे जातीविषयीची ,दिव्यांग संवर्गाची, इत्यादींची माहिती असणारे प्रमाणपत्र तयार करून मगच अर्ज भरा. जर प्रवेश घेतेवेळी या मध्ये तफावत आढळल्यास त्याची/तिची निवड अपात्र ठरू शकते.

३. अ) प्रवेश अर्जातील जन्मदिनांक आकड्यात आणि अक्षरी दोन्ही पद्धतीने लिहा. शाळेतील नोंदीनुसार तो बिनचूक लिहा. जन्मदिनांक शाळेतील नोंदीपेक्षा भिन्न आढळल्यास त्या उमेदवाराचा प्रवेश रद्द होऊ शकतो.
ब) कायमस्वरूपी असणाऱ्या जन्मखुणेचा उल्लेख प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराने करणे आवश्यक आहे.

४. जवाहर नवोदय विद्यालयाच्या निवडचाचणी साठी अर्ज करतांना उमेदवाराची तसेच पालकाची स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे.

५. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत **-<u>३० नोव्हेंबर २०१८ ही आहे</u>.**

<u>सावधान:-</u>

**अर्जातील कोणतेही सदर कोरे राहिल्यास अगर अपुरी /चुकीची माहिती भरल्यास तो अर्ज अपात्र समजून रद्द केला जाईल. उमेदवाराने अर्जातील सर्व अटींची पुर्तता (उदा: शिक्षण,वय,), विशेष संवर्ग (जसे अनुसूचित जाती/जमाती,अपंग), क्षेत्र (शहरी/ग्रामीण) या सर्व माहिती पूर्ण होत आहेत याची खात्री करून घ्यावी. उमेदवाराला प्रवेश मिळाल्यानंतर अर्जाची तपासणी करताना काही माहिती खोटी,अपुरी, भिन्न आढळल्यास त्याचा/तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल. आणि याबाबतचा नवोदय विद्यालय समितीचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील. याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार नंतर करण्यात येणार नाही. तसेच एखाद्या उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी खोटी,चुकीची प्रमाणपत्रे , शपथपत्र/ माहिती दिल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल व विद्यार्थ्याकरिता करण्यात आलेला सर्व खर्च नवोदय विद्यालय समितीच्या नियमानुसार वसूल केला जाईल.**

# रहिवासी प्रमाणपत्र

**( जे विद्यार्थी एन.आय. ओ. एस. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांना लागू )**

(निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतांना प्रस्तुत करावे.)

जवाहर नवोदय विद्यालय ______________________________जिल्हा ____________________राज्य____________ चे पत्र क्र.__________ दिनांक__________________ नुसार माझा पाल्य कु./कुमारी ________________________चा /ची जवाहर नवोदय विद्यालय __________________________________जिल्हा ____________________राज्य____________ च्या इयत्ता सहावीमध्ये शैक्षणिक वर्ष _________________ करिता प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून निवड झाली आहे.

मी प्रमाणित करतो/करते की मी माझ्या पाल्यासोबत मागील _________________ वर्षापासून खालील पत्त्यावर रहात आहे.

*** निवास स्थानाचे क्षेत्र जिल्ह्यातील ग्रामीण/शहरी भागांतर्गत येते.**

गाव/शहर _______________________________

तालुका ________________________________

जिल्हा ________________________________

राज्य ________________________________

पिनकोड ______________________________

मी असे प्रमाणित करतो/करते की वर दिलेली सर्व माहिती सत्य व खरी आहे. ही माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी नाही.

पालकांची सही<br>
पूर्ण नांव<br>
पत्ता

ठिकाण ___________________

दिनांक ____________________

# प्रमाणपत्र

(जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/तहसीलदार यांच्याद्वारे भरून जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी द्यावयाचे प्रमाणपत्र )

प्रमाणित करण्यात येते की जवाहर नवोदय विद्यालय ____________________________ जिल्हा ___________ च्या इयत्ता सहावीसाठी निवड झालेल्या कु./कुमारी __________________________________ चे माता/ पिता श्री./श्रीमती____________________________________च्या द्वारे वर दिलेली माहिती कार्यालयीन कागदपत्रांप्रमाणे सत्य/खरी आहे. त्यांचे निवास जेथे आहे ते गांव /शहर हे ग्रामीण/शहरी भागात आहे.

*** निवास स्थानाचे क्षेत्र जिल्ह्यातील ग्रामीण/शहरी भागांतर्गत येते.**

सही<br>
तहसीलदार /उपविभागीय दंडाधिकारी